## संक्षिप्त

### जोरदार पावसामुळे भातशेतीचे नुकसान

**जुन्नर, जि. पुणे :** दाऱ्या घाटाच्या पायथ्याशी असलेल्या आंबोली (ता. जुन्नर) येथे गुरुवारी (ता. १६) झालेल्या जोरदार पावसाने भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. येथील नामदेव भालचिम, वसंत भालचिम, दिगंबर भालचिम, रोहिदास भालचिम, सीताराम भालचिम या शेतकऱ्यांच्या भात खाचरांत ओढ्याच्या पाण्याचा प्रवाह घुसल्याने भात रोपे व माती वाहून गेली आहे. यामुळे सुमारे ५० हजारांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेचा पंचनामा करून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी या शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे केली आहे.

### भादसच्या उपसरपंचपदी उषा जाधव

**पौड, जि. पुणे :** भादस ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी उषा राजेंद्र जाधव यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपसरपंच दीपाली जोरी यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागी उषा जाधव यांची निवड करण्यात आली. या ग्रामपंचायतीत भादस, शिळेश्वर, गावडेवाडी या गावांचा समावेश होतो. सरपंच राजेंद्र मंगडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या निवडप्रक्रियेचे काम निवडणूक निर्णय अधिकारी, ग्रामसेवक लक्ष्मण साळवी यांनी पाहिले. या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य दीपाली जोरी, सुवर्णा चव्हाण, प्रवीण जोरी, मंगेश गावडे, सुलाबाई पांडव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष बंडू मेंगडे, रिपब्लिकन पक्षाचे युवक अध्यक्ष अरुण जाधव, भाजपचे युवा नेते लहू चव्हाण उपस्थित होते.

# पुणे जिल्ह्यातील धरणे 'ओव्हरफ्लो'; पाण्याचा विसर्ग सुरू

## धरणांमध्ये पावणे दोनशे टीएमसी उपयुक्त पाणीसाठा

**पुणे (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील बहुतांशी भागात पावसाचा खंड असतानाही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात कमी अधिक पाऊस पडल्याने निम्म्याहून अधिक धरणे ओव्हरफ्लो झाली आहेत. या धरणांतून पाण्याचा मोठा विसर्ग करावा लागल्याने नद्या दुथडी भरून वाहत असून, उजनी धरणातील पाणीपातळीत मोठी वाढ झाली आहे. उजनीसह जिल्ह्यातील धरणांची एकूण उपयुक्त क्षमता २१८.४० टीएमसी असून, शनिवारी (ता.१८) सकाळी आठ वाजेपर्यंत सर्व धरणांमध्ये मिळून सुमारे १७४.२५ टीएमसी (८० टक्के) उपयुक्त पाणीसाठा झाला होता.

जिल्ह्यातील कळमोडी, चासकमान, वडिवळे, आंद्रा, पवना, मुळशी, खडकवासला, पानशेत, वरसगाव, निरा देवघर, भाटघर, वीर ही धरणे १०० टक्के भरून 'ओव्हरफ्लो' झाली आहेत. कुकडी खोरे वगळता बहुतांशी धरणात ९० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा झाला आहे. अनेक धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू असून, सांडवा आणि कालव्यातून पाणी सोडण्यात येत आहे. यात येडगाव धरणातून १४०८ क्युसेक, वडज १४२७, डिंभे धरणातून ५८०, घोड धरणातून ५६५, कळमोडी धरणातून ७२०, चासकमान धरणातून ६ हजार २३, वडिवळे धरणातून २७५, आंद्रा धरणातून ५१६, पवना धरणातून ३६०८, कासारसाई धरणातून १५०, मुळशी धरणातून ४ हजार ३२२, टेमघर धरणातून ७७६, वरसगाव धरणातून २ हजार ६९०, पानशेत धरणातून २ हजार ९३१, खडकवासला धरणातून ११ हजार ६७६, निरा देवघर धरणातून ३ हजार ३६६, भाटघर धरणातून ३ हजार ११६, वीर धरणातून १६ हजार २८८ क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

### उजनीतून विसर्ग सुरू

पुणे, सोलापूर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरण जवळपास निम्म भरले असून, भीमेच्या खोऱ्यातून होत असलेल्या पाणीपुरवठ्यामुळे पाणीपातळी वाढतच आहे. उजनी धरणामध्ये २५.७४ टीएमसी (४८ टक्के) उपयुक्त पाणीसाठा झाला आहे. अचल साठा विचारात घेता उजनीमध्ये ८९.३९ टीएमसी म्हणजेच एकूण क्षमतेच्या (११७.२१ टीएमसी) ७६ टक्के पाणीसाठा झाला आहे. उजनी धरणातून सुमारे ४ हजार १५० क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्गही सुरू आहे.



**पुणे : अहल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळाच्या वतीने बकरी ईदसाठी गोखलेनगर येथे शनिवारपासून (ता. १८) बोकड विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्रावर शनिवारी ३०० बोकडांची आवक झाली असून, मंगळवार (ता.२१) पर्यंत १ हजार बोकड विक्रीचे उद्दिष्ट महामंडळाच्या वतीने ठेवण्यात आले आहे. या वेळी बोकड खरेदी करताना ग्राहक.**

## कोयनेसह, धोम, कण्हेर धरणांतून विसर्ग

**सातारा (प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील पश्चिम भागात शुक्रवारी (ता. १७) हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. कोयनेसह धोम व कण्हेर धरणांतून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याची माहिती पाटबंधारे विभागाच्या सूत्रांनी दिली.

कोयना धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर काहीसा कमी झाला असल्याने धरणातून पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आला आहे. कोयना धरणाचे दरवाजे शनिवारी सकाळी नऊ वाजता पाच फुटांवरून चार फुटांवर आणण्यात आले आहेत. सध्या या दरवाजांतून ३३,२१८ व पायथा वीजगृहातून २१०० असा एकूण ३५ हजार ३१८ क्युसेक पाण्याचा विसर्ग केला जात आहे. धरणात प्रतिसेकंद ४२,४२७ क्युसेक पाण्याची आवक होत असून, शनिवारी सकाळी आठपर्यंत १०१.३६ टीएमसी पाणीसाठा झाला.

धोम धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाचा जोर वाढल्याने शुक्रवारी दुपारी एक वाजता सांडवा व वीजगृहातून ५६६८ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला होता. त्यानंतर रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास पाण्याचा विसर्ग १०,२२३ क्युसेक करण्यात आला होता. पावसाचा जोर कमी झाल्यामुळे शनिवारी सकाळी नऊ वाजता विसर्ग कमी करण्यात आला आहे. सध्या धरणाच्या सांडवा व वीजगृहातून ७,२६० क्युसेक पाण्याचा विसर्ग केला जात आहे. कण्हेर धरणातील पाणी पातळी नियंत्रित राहण्यासाठी धरण व्यवस्थापनाकडून शनिवारी सकाळी ११ वाजता ३,९८१ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पाण्याचा विसर्ग नदीपात्रात केला जात असल्याने कोयना, कृष्णा, वेण्णा नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. जिल्ह्यातील महाबळेश्वर, पाटण, जावळी, सातारा, कऱ्हाड, वाई या पश्चिमेकडील तालुक्यांत हलका ते मध्यम व दुष्काळी तालुक्यांत तुरळक पाऊस सुरू आहे.

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
महाधन नजर ठेवा उद्यावर
प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद
**'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**
**कार्यक्रम वेळापत्रक**
**सोमवार, २० ऑगस्ट २०१८ रोजी**
**विषय** – ऊस पीक व्यवस्थापन
**वक्ते – श्री. आर. एन. गायकवाड** (तांत्रिक अधिकारी) वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट
**स्थळ** – श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर सभागृह, मु. पो. विठ्ठलवाडी, ता. शिरूर, जि. पुणे
**वेळ** – सकाळी ८.३० वा.
**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# खरिपाची १ लाख ४७ हजार हेक्टरवर पेरणी

## पुणे जिल्ह्यातील स्थिती; सोयाबीनचा १८ हजार हेक्टरवर पेरा

**पुणे (प्रतिनिधी) :** गेल्या पाच ते सहा दिवसांपासून पुणे जिल्ह्यातील काही भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. त्यामुळे खरिपातील पिकांना दिलासा मिळाला आहे. जिल्ह्यात खरिपाचे सरासरी क्षेत्र दोन लाख ३० हजार ८३० हेक्टर आहे. त्यापैकी एक लाख ४७ हजार ६८६ हेक्टरवर म्हणजेच सरासरी ६४ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली असल्याची माहिती कृषी विभागाच्या सूत्रांनी दिली.

जिल्ह्यात भात पिकाची ५६ हजार ३७९ हेक्टरवर पुनर्लागवड झालेली आहे. जोरदार पावसामुळे भात पीकवाढीच्या अवस्थेत आहे. काही ठिकाणी अजूनही भात लागवडी सुरू आहेत. भोर, वेल्हा, मावळ या तालुक्यांत ५९२ हेक्टरवर यंत्राद्वारे भात लागवड प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. बाजरी पीकवाढीच्या अवस्थेत असून शिरूर, दौंड, इंदापूर, बारामती व पुरंदर या तालुक्यांमध्ये पुरेशा पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली आहे.

जूनच्या सुरवातीच्या काळात पुरेसा पाऊस न झाल्यामुळे मूग व उडीद या पिकांची पेरणी क्षेत्र कमी झाले आहे. सुरवातीस पेरलेले मूग पीक फुलोरा अवस्थेत असून, शिरूर तालुक्यात काही ठिकाणी पावसाअभावी पिके सुकू लागली आहेत. भुईमूग पीकवाढीच्या अवस्थेत आहेत. सोयाबीन पिकाचे सरासरी पाच हजार २०० हेक्टर क्षेत्र भोर, जुन्नर, खेड, आंबेगाव व बारामती तालुक्यांमध्ये आहे. जिल्ह्यामध्ये १७ हजार ९४६ हेक्टरवर सोयाबीन पिकाची पेरणी झाली आहे. हे पीकवाढीच्या अवस्थेत आहे. सोयाबीन पिकांवर अल्पप्रमाणात किडींचा प्रादुर्भाव झाला



असून, कृषी विभागामार्फत योग्य त्या उपाययोजना सुचविल्या जात आहेत. मका पीकवाढीच्या अवस्थेत आहे. कापूस पिकाची शिरूर, बारमती, इंदापूर, दौंड या तालुक्यांमध्ये मिळून ४७ हेक्टरवर पेरणी झाली आहे. हे पीकदेखील वाढीच्या अवस्थेत आहे.